# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-17.04.2026** **वार- शुक्रवार**

---

**बारामती निवडणूक**

बारामती विधानसभा मतदारसंघाच्या आगामी पोटनिवडणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्रांचं द्वितीय यादृच्छिकीकरण काल बारामतीत पार पडलं. ईव्हीएम व्यवस्थापन प्रणालीच्या माध्यमातून, बारामतीतील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी, भारत निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या, साठवण आणि सुरक्षा नियमांनुसार, निवडणूक लढवणारे उमेदवार तसंच राष्ट्रीय, आणि  राज्यस्तरीय मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पूर्ण केली.

**मतदार यादी-पुनरीक्षण**

पुणे जिल्ह्यात येत्या काही दिवसांत मतदार यादीचा सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येणार असून, त्याअंतर्गत 2002 सालच्या मतदार यादीतील नावांची पडताळणी आणि मॅपिंग प्रक्रिया सध्या सुरू आहे. या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून सहकार्य करावं, असं आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आलं आहे.

**दिव्यांग व्यक्ती-हयात दाखला**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या  हद्दीतील, 18 वर्षे, आणि त्यापुढील वयाच्या दिव्यांग व्यक्तींना, हयातीच्या दाखल्यासाठी आता, ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करता येणार आहे. यासाठी महापालिकेने 'पीसीएमसी दिव्यांग लाइफ सर्टिफिकेट' हे अँड्रॉईड ॲप विकसित केलं  आहे. या ॲपमुळे आता दिव्यांग व्यक्ती, हयातीच्या दाखल्याची नोंद घरबसल्या करू शकणार आहेत. संबंधित लाभार्थ्यांनी, 17 एप्रिल ते 31 मे या कालावधीत, नोंदणी करावी, असं आवाहन महापालिकेच्या वतीनं करण्यात आलं आहे.

**बालचित्रपट महोत्सव**

पुण्यातील संवाद संस्था आणि कावरे आईस्क्रिमतर्फे आयोजित, बालचित्रपट महोत्सवाला आजपासून सुरुवात झाली. 23 एप्रिल पर्यंत चालणाऱ्या या महोत्सवाचा प्रारंभ 'क्रांति ज्योती विद्यालय' या चित्रपटाच्या प्रदर्शनाने करण्यात आला. कोथरूड मअधल्या सिटी प्राइड चित्रपटगृहांत झालेल्या उद्घाटनपर कार्यक्रमाला साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त बालसाहित्यकार ल. म. कडू, अभिनेत्री संस्कृती बालगुडे, चित्रपट दिग्दर्शक धनंजय भावलेकर, कावरे आईस्क्रिमचे राजू कावरे, संवाद पुणेचे अध्यक्ष सुनील महाजन, शालेय विद्यार्थी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.  मराठी चित्रपटांना उभारी मिळण्यासाठी असे महोत्सव उपयोगी ठरतात, असं प्रतिपादन दिग्दर्शक धनंजय भावलेकर यांनी याप्रसंगी बोलताना केलं.

**शून्य कचरा वर्ग**

पिंपरीतील, मोशी मधल्या, सावित्रीबाई फुले प्राथमिक कन्या शाळेतील विद्यार्थिनींच्या पुढाकारातून, 'शून्य कचरा वर्ग' या अभिनव संकल्पनेवर आधारित नाविन्यपूर्ण उपक्रम नुकताच प्रभावीपणे राबविण्यात आला. विद्यार्थिनींमध्ये स्वच्छतेची जाणीव आणि जबाबदारीची भावना रुजविणे या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत, वर्गात कचरा निर्माण होऊ नये यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे, प्लास्टिक कचऱ्याचं प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झालं असून, कागदाचा अपव्ययही कमी झाला आहे. या उपक्रमात वर्गातील एकंदर  45 विद्यार्थिनी सहभाग घेतला असून, त्यांना वरिष्ठ शिक्षकांचं मार्गदर्शन लाभलं आहे.

**शिक्षक पात्रता अर्ज-मुदतवाढ**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत, 21 जून 2026 ला घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचा अर्थात महाटीईटीचा ऑनलाइन अर्ज भरण्याला 24 एप्रिल पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा परिषदेचे आयुक्त महेश चौथे यांनी दिली आहे.

**रोजगार-फसवणूक**

वाढत्या औद्योगिकीकरणामुळे, पुणे जिल्ह्यात, रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहेत. मात्र, या संधींचा गैरफायदा घेत काही फसवणूक करणाऱ्या व्यक्ती आणि बनावट संस्था, बेरोजगार युवक-युवतींना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळवून देण्याचं आमिष दाखवून आर्थिक फसवणूक करत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर, सर्व बेरोजगार तरुण-तरुणींना सतर्क राहण्याचे आवाहन, पुणे जिल्ह्याच्या कामगार उप आयुक्त कार्यालयाकडून करण्यात आलं आहे.

**राखीव पाणीसाठा**

जलसंपदा विभागामार्फत, दर वर्षी 32 जुलैपर्यंत पिण्यासाठी पाणी राखीव ठेवण्यात येते. मात्र, यावर्षी पाऊस, उशिरा आणि कमी प्रमाणात पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आल्याने, खडकवासला धरण साखळीतील पाणी, 31 ऑगस्टपर्यंत पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय विभागाने घेतला आहे. आजच्या तारखेला, धरणसाखळीत, गतवर्षीपेक्षा 1 पूर्णांक 30 टीएमसी अधिक पाणीसाठा असला, तरी, यंदा उन्हाची तीव्रता अधिक असल्याने, पाण्याची मागणी वाढली आहे; त्यामुळे आगामी साडेचार महिने शहरातील नागरिकांची तहान भागविण्यासाठी जलसंपदा विभागाला कठोर उपाययोजना कराव्या लागणार आहेत.

**पिंपरी-चिंचवड-दिव्यांग क्रीडा स्पर्धा**

पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे, संत ज्ञानेश्वर महाराज क्रीडा संकुलात, मतिमंद आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते आज या स्पर्धांचं उद्घाटन करण्यात आलं. भविष्यातही अशा स्पर्धांचं आयोजन अधिक व्यापक स्वरूपात करण्यात येईल, असं प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी याप्रसंगी बोलताना केलं.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज तापमानाचा पारा चढाच होता. नागरिक उन्हाच्या झळांमुळे हैराण झाले आहेत. पुण्यात आज कमाल 40 अंश आणि किमान 18 पूर्णांक 7 अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. उद्या देखील याच प्रकारचं हवामान राहण्याचा अंदाज वेधशाळेने वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, संध्याकाळी सहा वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतसह, नमस्कार.**